# उल्हासनगर महानगरपालिका

पर्यावरण विभाग

## प्रेसनोट

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचेकडील दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत " चला जाणुया नदीला" या अभियानाअंतर्गत नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रूपरेषा आखणे, नदी अमृतवाहिनी बनविण्यासाठी मसुदा तयार करणे तसेच जनसामान्यांना नदीसाक्षर करण्याबाबत उपाययोजना करणे इत्यादी कार्यवाही करावयाची आहे.

महाराष्ट्र राज्यातील एकुण १०३ नदयांअंतर्गत ठाणे जिल्हयातील उल्हास नदीचा "चला जाणुया नदीला" या अभियानात समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या आदेशान्वये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाअंतर्गत चला जाणुया नदीला या उपक्रमामध्ये नदी संवाद यात्रा आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी पालिका क्षेत्रातील नदया व त्यांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यांची सोडवणूक करण्यासाठी मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका स्थायी समिती सभागृहामध्ये दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी सर्व संबंधित विभागांची बैठक घेण्यात आली. दरम्यान येत्या काळात नदी स्वच्छता मोहिम राबविण्यासाठी महापालिका प्रशासनातर्फे विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

सदर बैठकीदरम्यान, अतिरिक्त आयुक्त (शहर) जमीर लेंगरेकर, शहर अभियंता, श्री. प्रशांत सोळंके, नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे, सहा. सार्व. आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे, पर्यावरण विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण येथील श्री. अनिरूध्द वराळे तसेच महापालिकेतील सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये शासनाच्या चला जाणुया नदीला या उपक्रमाअंतर्गत शासकिय सर्व यंत्रणांना जोडून कशाप्रकारे अभियान यशस्वीपणे राबवुन नदी स्वचछतेची मोहिम यशस्वी करता येईल याबाबत स्नेहल दोंदे, जलप्रहरी सदस्य, ठाणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी शासनाच्या चला जाणुया नदीया या उपक्रमाअंतर्गत नदी स्वच्छता मोहिम राबविण्यासाठी महापालिकेच्या सर्व विभागांनी सहभाग घेवुन सदर अभियान यशस्वी करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता करण्यात येईल असे सांगितले.

( जमीर लेंगरेकर )
अतिरिक्त् आयुक्त (शहर)
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका